# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 16.10.2025** **वार- गुरुवार**

---

**राजनाथसिंह**

आज जग वेगाने बदलत असून प्रत्येक क्षणाला नवा विचार, नवी व्यवस्था, नव्या तंत्रज्ञानाच्या आणि कौशल्याच्या माध्यमातून देशाला पुढे नेण्याची गरज असल्याचं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी आज पुण्यात केलं. सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या सहाव्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकात पाटील, लष्कराच्या दक्षिण कमांडचे प्रमुख ले.जनरल धीरज सेठ, विद्यापीठाचे कुलपती डॉ.शां.ब. मुजुमदार आदी यावेळी उपस्थित होते. सिम्बायोसिस विद्यापीठदेखील या दिशेने काम करत असून नोकरी मिळविण्यासाठी नाही तर नोकरी देण्याची क्षमता निर्माण करणारे शिक्षण येथे देण्यात येत आहे, असे गौरवोद्गार देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी काढले. संरक्षण साहित्य निर्मितीमध्ये भारतीय युवांनी मोठा पुढाकार घेतला असून गेल्या १० वर्षात आपली संरक्षण साहित्य निर्मिती ४६ हजार कोटी रुपयांवरून १ लाख ५० हजार कोटींपर्यंत पोहोचली आहे. यातही सुमारे ३३ हजार कोटी रुपयांचे खासगी क्षेत्राचे योगदान आहे. २०२९ पर्यंत आपली उत्पादनक्षमता ३ लाख कोटींपर्यंत नेण्याचे आणि संरक्षण साहित्य निर्यात ५० लाख कोटींपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे, असंही ते म्हणाले.

देश संरक्षण उत्पादनाच्या क्षेत्रात सातत्याने पुढे जात असताना महाराष्ट्राला संरक्षण तंत्रज्ञानाचे केंद्र बनविण्याचा प्रयत्न राज्य सरकार करत असून येत्या काळात या क्षेत्रातील गुंतवणुक, उत्पादन आणि मनुष्यबळ निर्मिती राज्यात होईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

**<u>इलेक्ट्रिकट्रक</u>**

ब्ल्यू एनर्जी मोटर्स निर्मित स्वॅपेबल बॅटरी असलेला इलेक्ट्रिक ट्रक म्हणजे 'रिव्होल्यूशन ऑन व्हील' असून त्यातील तंत्रज्ञान आणि कार्यक्षमता लक्षात घेता येत्या काळात या क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विस्तार होईल. राज्य शासन मुंबई- पुणे इलेक्ट्रीक कॉरिडोअरसारखे अन्य कॉरिडोर करण्यासाठी सर्व सहकार्य करेल असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. निघोजे येथील ब्ल्यू एनर्जी मोटर्स ईव्ही ट्रकच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. ब्ल्यू एनर्जीने अत्यंत उत्तम आणि 'मेड इन इंडिया' ट्रकची निर्मिती केली असून यामुळे देशाचे 'मेक इन इंडिया'चे स्वप्न साकार होणार आहे असंही फडणवीस यावेळी म्हणाले.

**<u>स्थगिती</u>**

पुणे शहरातील बालभारती ते पौड फाटा रस्त्याच्या कामावरील स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने उठविली आहे. वेताळ टेकडीवरून जाणाऱ्या या रस्त्यासाठी पुणे महापालिकेने पर्यावरण विभागाची परवानगी घेण्याचे आदेश सरन्यायाधीश न्यायमूर्ती  भूषण गवई आणि विनोद चंद्र यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. सेनापती बापट रस्ता आणि कोथरूड परिसराला जोडण्यासाठी बालभारती-पौडफाटा या शंभर फुटी रस्त्याची संकल्पना मांडण्यात आली होती. मात्र, या रस्त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होईल, असा दावा करत डॉ. सुषमा दाते आणि आयएलएस विधी महाविद्यालय न्यायालयात गेले होते.

**<u>वसुबारस</u>**

महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी राज्यातील सर्व गोशाळा संचालक, शेतकरी, पशुपालक आणि गोपालक बांधवांना वसुबारस सप्ताह उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केलं आहे. हा दिवस कृषी आणि पशुपालन संस्कृतीशी घट्टपणे जोडलेला असल्याने तो मोठ्या श्रद्धेने साजरा करताना विविध उपक्रमांचे आयोजन करावं असंही त्यांनी सांगितलं.

**<u>दिवाळीपहाट</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने 'दिवाळी पहाट' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे. १८ ऑक्टोबर रोजी पहाटे ६ वाजता आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात पार पडणार आहे.

**<u>जुनेसामान</u>**

दिवाळीपूर्वी घरातील साफसफाईनंतर जुन्या झालेल्या वस्तू फेकून देण्याऐवजी महापालिकेने सुरु केलेल्या आर.आर.आर. केंद्रात दिल्यास त्यांचा पुनर्वापर होऊन गरजूंना त्याचा थेट फायदा होऊ शकतो. त्यामुळे अशा वस्तू या सेंटरमध्ये जमा करण्याचं आवाहन महापालिकेच्यावतीनं करण्यात आलं आहे.

**<u>बाजारबंद</u>**

येत्या गुरूवारी म्हणजेच २३ ऑक्टोबर रोजी "भाऊबीज" सणानिमित्त पुण्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचा मार्केटयार्ड येथील मुख्यबाजार आवारातील "फळेभाजीपाला विभाग, पान बाजार, केळी बाजार तसेच मोशी उपबाजार बंद राहणार आहेत. तसंच मुख्य बाजार आवारातील फुलांचा बाजार भाऊबीजेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी २४ ऑक्टोबर रोजी बंद राहणार आहे.

**<u>खोदाईथांबवा</u>**

महापालिकेची परवानगी नसताना पोलिसांच्या सीसीटीव्ही केबलसाठी खोदाई करणाऱ्या ठेकेदाराला महापालिकेने कडक शब्दांत समज देत दिवाळीपर्यंत रस्ते खोदाई थांबवण्याचे आदेश दिले आहेत. आदेशाचे उल्लंघन केल्यास कडक कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे.

<u>**पीएमआरडीए**</u>

पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरण अर्थात पीएमआरडीएची जिल्ह्यात ९ क्षेत्रीय कार्यालय नुकतीच सुरू झाल्याने नागरिकांची सोय होणार असल्याची माहिती पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. तसच पीएमआरडीए तर्फे ९०० कोटी रुपये खर्चाचे २४८ किलोमीटरचे रस्ते बांधण्यात येणार असून पुणे विद्यापीठ चौकातील बाणेर पूल एक महिन्यात तर औंध पूल डिसेंबरपर्यंत सुरू होईल, अशी माहिती म्हसे यांनी दिली.

हवामान

पुणे आणि परिसरात कमाल तापमान ३२ तर किमान तापमान २० पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता,ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**